REVIEW OF RESEARCH

# चरित्र वाङ्‌मयाचे घटक

डॉ. घोडके बापूसाहेब गोरख

सी.डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## प्रस्तावना

जगातील सर्व भाषामध्ये चरित्र हा वाङ्‌मय प्रकार रुजला व प्रस्थापित झालेला आहे. त्यामुळे चरित्र लेखन हा एक प्राचीन व महत्त्वाचा वाङ्‌मय प्रकार आहे. मराठी साहित्याला चरित्रात्मक लेखनाची दीर्घ परंपरा आहे. जागातील सर्व भाषेत व संस्कृतीमध्ये नैतिक दृष्टिकोनातून किंवा आदर्श करणाच्या प्रेरणेतून लिहिलेल्या आठवणी, ऐतिहासिक बखरी आणि व्यक्तिचत्रिणात्मक छोटेखानी चरित्रे यांच्यापासून चरित्र लेखनाला प्रारंभ झाला आहे. त्यामुळे प्रत्येक भाषेतील समीक्षकांनी चरित्र वाङ्‌मयाच्या निकषांची चर्चा ही मोठ्या प्रमाणात केलेली आहे. चरित्रे का लिहिली जातात ? ती लिहिण्यांपाठीमागे हेतू कोणता ? असे अनेक प्रश्न चरित्र वाङ्‌मयासंबंधी आपल्या मनात उभे राहतात. पाश्चिमात्य व पौर्वात्य विचारवंतानी चरित्र लेखनाची प्रयोजने, भूमिका, हेतू व उद्दिष्टाविषयी वेगवेगळी मते मांडली आहेत. चरित्राचे लेखन करताना व्यक्तिचित्रण, घटना, प्रसंग वर्णन, निवेदन शैली, भाषा, सत्यता, ऐतिहासिक वस्तुनिष्ठता, विश्वसनीय, नि:पक्षपातीपणा व तटस्थता व चरित्र वाङ्‌मय सामग्री इ. चरित्र वाङ्‌मयाचे घटक महत्त्वाचे असतात.

## व्यक्तिचित्रण (स्वभाव चित्रण)

चरित्र लेखनात चरित्रनायकाच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व दर्शनाला अनन्यसाधारण महत्त्व असते. सिडनेली या अभ्यासकाने चरित्राची व्याख्या,'मानवी व्यक्तिमत्त्वाचे सत्यपूर्ण व कलात्मक दर्शन म्हणजे चरित्र होय.'[1] अशी केली आहे. मानवी जीवन हा चरित्राचा आत्मा असतो. चरित्रात इतिहासालाही महत्त्वाचे स्थान असले तरी व्यक्ती जीवनाचा इतिहास इथे अभिप्रेत आहे, म्हणून कालाईल म्हणतो,'चरित्र म्हणजे एका व्यक्तीचा इतिहास आणि अनेक चरित्रे म्हणजे राष्ट्राचा इतिहास.' थोडक्यात इतिहासात काळ महत्त्वाचा असतो तर चरित्रात व्यक्ती महत्त्वाची असते. चरित्रात व्यक्तीच्या जीवनातील घटना, प्रसंग, विचारसरणी, सामाजिक व व्यक्तिगत जीवन यांचे चित्रण केले जाते. हे चित्रण करत असताना व्यक्तीचा स्वभाव, आवड-निवड कशा स्वरुपाची आहे हे अपेक्षित असते. इतिहास वाचताना व्यक्तीचे सामाजिक जीवन समजते पण व्यक्तिगत जीवन पाहावयाचे असल्यास वाचकाला चरित्र किंवा आत्मचरित्राचा आधार घ्यावा लागतो.

चरित्रात व्यक्तिचित्रणाला महत्त्व असल्यामुळे चरित्रनायकाचा स्वभाव, व्यक्तिमत्त्व, भाव-भावना यांचे चित्रण चरित्रात केले जाते. चरित्रनायकाचे अंतर्गत व बहिर्गत मन उलगडून दाखविण्याचा प्रयत्न चरित्रात केला जातो. म्हणजेच चरित्रनायकाचे हुबेहुब व जिवंत व्यक्तिचित्रण करण्याचा प्रयत्न केला जातो. चरित्रनायकाचे व्यक्तिचित्रण जर जिवंत झाले तर ते चरित्र वाचनीय, अभ्यासनीय व आदर्शवत होते. त्यामुळे चरित्र वाङ्‌मयात चरित्रनायकाचे व्यक्तिचित्रण हा घटक खूप महत्त्वाचा आहे.

## घटना व प्रसंग वर्णन

चरित्रलेखनात व्यक्तिचित्रण व स्वभावचित्रणाला महत्त्वाचे स्थान तरी ते चरित्रनायकाच्या जीवनातील विविध घटना व प्रसंगाशिवाय ते पूर्ण होत नाही. त्यामुळे चरित्रलेखनात घटना प्रसंगात चरित्रनायकाच्या जीवनातील व समाजातील घटना प्रसंग मांडत असताना त्या घटना प्रसंगांचा व चरित्रनायकाचा जो संबंध आहे त्यावर अधिक भर देणे आवश्यक आहे. थोडक्यात चरित्रात घटना व प्रसंग सुटे-सुटे न येता चरित्रनायकाच्या जीवनातील वेगवेगळ्या घटना व प्रसंगाचे चित्रण

करताना चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन अपेक्षित आहे. चरित्रात नुसतेच चरित्रनायकाच्या जीवनातील घटना व प्रसंग सांगितले तर ते चरित्र वाङ्मय संकल्पनेला छेद दिल्यासारखे होईल. त्यामुळे चरित्रनायकाच्या जीवनातील वेगवेगळ्या घटना व प्रसंगाची कल्पकतेने निवड करुन कलात्मकतेने मांडणी केली तर चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावीपणे मांडता येते. त्यातच चरित्र वाङ्मयाचे खरे यश आहे.

## 3. निवेदन शैली

चरित्र वाङ्मय प्रकारात निवेदनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कथा, कादंबरी, आत्मचरित्र या साहित्यप्रकारांचे स्वरुप प्राधान्याने आत्मनिष्ठ असते. परंतु व्यक्ती जीवनाचा इतिहास आणि सामाजिक सांस्कृतिक वास्तव या दोन घटकांना चरित्रात विशेष महत्त्व प्राप्त होत असल्याने चरित्राचे स्वरुप वस्तुनिष्ठ बनते. त्यामुळे कथा, कांदंबरी यासारख्या कल्पनाप्रधान साहित्यकृतीच्या स्वरुपापेक्षा चरित्र वाङ्मयाचे स्वरुप स्वाभाविकच भिन्न ठरते. चरित्रात आत्मनिष्ठतेपेक्षा वस्तुनिष्ठतेला प्राधान्य असल्यामुळे तृतीयपुरुषी निवेदन पध्दती हा चरित्राचा एक विशेष बनतो. थोडक्यात वास्तवात होऊन गेलेल्या व्यक्तीच्या जीवनकथेचे निवेदन चरित्रात केलेले असते. चरित्रात चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे जिवंत चित्रण करावयाचे असते ते चरित्रनायकाच्या जीवनातील घटना व प्रसंग देऊन जिवंत करता येत. निवेदनाच्या माध्यमातून उपयुक्त साधनांचा कलात्म व कौशल्यपूर्ण उपयोग चरित्रनायकाचा जीवन इतिहास व व्यक्तिमत्त्व चरित्रात साकार करावयाचे असते.

## 4. भाषा

भाषा हा साहित्यकृतीचा आत्मा असतो. भाषेशिवाय कोणताही साहित्यप्रकार विकसित होऊ शकत नाही. कोणत्याही साहित्यप्रकाराला उठावदारपणा, बहारदारपणा, जिवंतपणा, प्रवाहीपणा आणण्यांचे काम भाषेच्या माध्यमातून केले जाते. चरित्र वाङ्मयातही भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चरित्रनायकाच्या जीवनातील सर्व नोंदी तपशिलासह द्यावयाच्या असल्यामुळे चरित्र वाङ्मय प्रकार कला व शास्त्र या दोन्ही शाखांच्या सीमारेषेवरील प्रकार ठरतो. त्यामुळे चरित्रनायकाच्या जीवनातील घटना प्रसंग व व्यक्तिमत्त्वाची मांडणी करताना भाषेचा जपून व तारतम्यानेच वापर करावा लागतो, कारण भाषेचा जर कलात्मकतेच्या अंगाने जास्त वापर केला तर त्या चरित्राला चरित्रात्मक कादंबरीचे स्वरुप प्राप्त होते व शास्त्राच्या अंगाने वापर केला तर त्याला वृत्तपत्रलेखनाचे किंवा इतिहासलेखनाचे स्वरुप प्राप्त होते म्हणून चरित्रलेखनात भाषेच्या वापरला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते.

## 5. सत्यता किंवा ऐतिहासिक वस्तुनिष्ठता

चरित्र वाङ्मयाचे यश हे सत्यता, वस्तुनिष्ठता, विश्वसनीयता, नि:पक्षपातीपणा व तटस्थता यावर सर्वस्वी अवलंबून आहे, कारण चरित्राचे लेखन करताना चरित्रनायकाच्या जीवनातील घटना, प्रसंगाची कलात्मकपणे मांडणी करुन सत्यता व वस्तुनिष्ठतेला कोणत्याही प्रकारची बाधा येता कामा नये याची दक्षता चरित्रकाराने घेतली पाहिजे. या विषयी बोस्वेल म्हणतो,'कोणलाही खूश करण्यांसाठी वाघाची नखे छाटून त्याला मांजर बनवून टाकण्यांची माझी इच्छा नाही.'[2] यावरुन चरित्रात सत्यता व वस्तुनिष्ठतेला किती महत्त्व आहे हे लक्षात येते. चरित्र ही एक ललित साहित्यकृती आहे. त्यामुळे चरित्र लेखनासाठी आवश्यक साधनसामग्री गोळा करुन त्याचे योग्य पध्दतीने वर्गीकरण करणे आवश्यक आहे. वर्गीकरण करताना सत्य-असत्य वस्तुनिष्ठता, विश्वसनीयता तपासणे आवश्यक आहे, कारण चरित्रात प्रामाणिकतेला व विश्वसनीयतेला खूप महत्त्व आहे. चरित्राच्या समीक्षा व मीमांसेच्या दृष्टीने सत्यता व ऐतिहासिक वस्तुनिष्ठता यांना महत्त्वाचे स्थान आहे. सारांश चरित्र वाङ्मयाचे व्यक्तिदर्शन हे सुसंगत, उठावदार, स्वाभाविक, पूर्ण व वस्तुनिष्ठ दाखविण्याकरता चरित्रनायकाच्या अंगचे गुणदोष सत्यतेने दाखविणे आवश्यक आहे.

## 6. चरित्र वाङ्मयाची सामग्री

चरित्र वाङ्मयात सत्यकथन व वस्तुनिष्ठता असली पाहिजे ही गोष्ट मान्य केल्यानंतर ते सत्य कोठे व कसे शोधावे ? हा प्रश्न चरित्रकारासमोर उभा राहतो. चरित्रलेखनाची अनेकविध साधने आहेत. त्यामध्ये पत्रे, वर्तमानपत्रे, रोजनिशी, आठवणी, त्यांचे लेख, त्यांची भाषणे, नातेवाईक व मित्रांनी सांगितलेली माहिती व आठवणी इ. साधनांचा यथायोग्य वापर चरित्रकाराला करावा लागतो. या साधनांच्या द्वारे चरित्रनायकाचा स्वभाव, कार्य, कर्तृत्व व मन:स्थितीचा आढावा घेता येतो, परंतु सर्वच नायकाबाबत ही माहिती उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे इतिहास संशोधकाप्रमाणे चरित्र लेखकासही संशोधकाचे कार्य करावे लागते. ते करत

असताना उपलब्ध साधनाद्वावारे चरित्रनायकाचा स्वभाव, कार्य, कर्तृत्व व मन:स्थितीचा आढावा घेता येतो. उपलब्ध साधनाद्वारे चिकित्सा व अंगभूत कौशल्य या दोन्हीचा आवश्यक तितका उपयोग करणे हेच चरित्रकाराचे कार्य व संशोधन असते.

अशा प्रकारे चरित्राचे लेखन करताना व्यक्तिचित्रण, घटना, प्रसंग वर्णन, निवेदन शैली, भाषा, सत्यता, ऐतिहासिक वस्तुनिष्ठता, विश्वसनीय, नि:पक्षपातीपणा व तटस्थता व चरित्र वाङ्मय सामग्री इ. घटकांचा योग्य प्रकारे वापर केला तर चरित्र वाङ्मय वाचनीय व अभ्यासनीय होईल. हे चरित्र वाङ्मयाच्या विविध घटकावरुन लक्षात येते.

## निष्कर्ष -

1. चरित्र लेखन हा एक प्राचीन व महत्त्वाचा वाङ्मय प्रकार आहे. सर्व भाषामध्ये चरित्र हा वाङ्मय प्रकार रुजला व प्रस्थापित झालेला आहे. मराठी साहित्यात चरित्रात्मक लेखनाची दीर्घ परंपरा आहे.
2. चरित्रनायकाचे व्यक्तिचित्रण जर जिवंत झाले तर ते चरित्र वाचनीय, अभ्यासनीय व आदर्शवत होते. त्यामुळे चरित्र वाङ्मयात चरित्रनायकाचे व्यक्तिचित्रण हा घटक महत्त्वाचा आहे.
3. चरित्रात चरित्रनायकाच्या जीवनातील वेगवेगळ्या घटना व प्रसंगाची कल्पकतेने निवड करुन कलात्मकतेने मांडणी केली तर चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावीपणे मांडता येते.
4. चरित्रात आत्मनिष्ठतेपेक्षा वस्तुनिष्ठतेला प्राधान्य असल्यामुळे तृतीयपुरुषी निवेदन पध्दती हा चरित्राचा एक विशेष बनतो. चरित्रात चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे जिवंत चित्रण करावयाचे असते ते चरित्रनायकाच्या जीवनातील घटना व प्रसंग देऊन जिवंत करता येत.
5. चरित्र वाङ्मयाचे यश हे सत्यता, वस्तुनिष्ठता, विश्वसनीयता, नि:पक्षपातीपणा व तटस्थता यावर सर्वस्वी अवलंबून आहे. चरित्र वाङ्मयाचे व्यक्तिदर्शन हे सुसंगत, उठावदार, स्वाभाविक, पूर्ण व वस्तुनिष्ठ दाखविण्याकरता चरित्रनायकाच्या अंगचे गुणदोष सत्यतेने दाखविणे आवश्यक आहे.
6. चरित्राचे लेखन करताना व्यक्तिचित्रण, घटना, प्रसंग वर्णन, निवेदन शैली, भाषा, सत्यता, ऐतिहासिक वस्तुनिष्ठता, विश्वसनीय, नि:पक्षपातीपणा व तटस्थता व चरित्र वाङ्मय सामग्री इ. घटकांचा योग्य प्रकारे वापर केला तर चरित्र वाङ्मय वाचनीय व अभ्यासनीय होईल.

## • संदर्भ

1. देसाई व लिमये,'चरित्र आणि आत्मचरित्र एक अभ्यास', फडके बुक सेलर्स, कोल्हापूर, 1976, पृ.33.
2. संत जान्ववी -'चरित्र आत्मचरित्र एक वाङ्मय प्रकार', मोघे प्रकाशन, कोल्हापूर, 1974. पृ. 19.
3. कऱ्हाडे स.दा.,'चरित्र आणि आत्मचरित्र', लोकवाङ्मय ग्रह प्रकाशन 1976
4. जोशी अ.म.,'चरित्र आाणि आत्मचरित्र तंत्र आणि विकास', प्रकाशक - श्री. एल.व्ही. तावरे, स्नेहवर्धन, 763 सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे-तृतीय आवृत्ती- 1999.
5. बोरगावकर व. दा.-'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन', कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे, 1978.
7. वष्ट जयवंत,'मराठी चरित्र : रुप आणि इतिहास', पद्मगंधा प्रकाशन, 36/11,धन्वंतरी सह. गृह संस्था, पांडुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे. 2009.
8. देशपांडे अ.ना,'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग पहिला 1974 ते 1920', व्हीनस प्रकाशन, पुणे. व्दितीय आवृत्ती-1992.

LBP PUBLICATION